महाराष्ट्र मंडळ शिकागो

“ कला वर्धिष्णु चंद्राची
विश्व वंद्य जशी तशी
मुद्रा ही शिवरायाची
असे कल्याणकारिणी ”



# रचना

भाद्रपद शके १९३३
सप्टेंबर २०११ : वर्ष ४२, क्र.३



MAHARASHTRA MANDAL CHICAGO

RACHANA

September, 2011:
Vol. 42, # 3

**Maharashtra Mandal Chicago, Inc.**
(Year of Establishment: 1969)
**Address for correspondence:**
**Email:** president@mahamandalchicago.org
secretary@mahamandalchicago.org
Karyakarini@mahamandalchicago.org
**Website**: http://www.mahamandalchicago.org

## सदस्य वर्गणी : (Membership Fees)
**( Event Fees Extra at a Discounted Price )**

| Category | Annual | |
|---|---|---|
| | Membership | Annual Pass* |
| New | - | - |
| Individual | 20 | 80 |
| Senior + | 20 | 80 |
| Child | 10 | 40 |
| Student | 10 | 40 |
| Couple | 40 | 160 |
| Couple+1Kid | 50 | 200 |
| Couple+2Kids | 50 | 230 |
| Senior+ Couple | 30 | 150 |

| Category | Life | Patron |
|---|---|---|
| | Annual Pass* | Annual Pass* |
| New | 600 | 1000 |
| Individual | 60 | - |
| Senior + | 60 | - |
| Child | 30 | 30 |
| Student | 30 | 30 |
| Couple | 120 | - |
| Couple+1Kid | 150 | - |
| Couple+2Kids | 180 | - |
| Senior+ Couple | 120 | - |

\+ Seniors’ age- over 65 years,
* Annual pass includes membership fees,
** kid’s age (5 -12 years) (age below 5 : no fees)

**Membership Benefits:**

- Great savings of average 35% over non membership
- You get discounts on 5 event admission's which may include dinners/snacks ...
- Wonderful opportunity to participate in community and networking. You will feel it at home!!!
- We have created a category for Senior Citizens.

## कार्यकारिणी - २०११
**(Executive Committee-2011)**

**अध्यक्ष :** मिलिंद पानट
**उपाध्यक्ष :** कल्पना नेकलीकर
**उपाध्यक्ष :** मयूर पाटील
**सचिव :** निलेश विळेकर
**खजिनदार :** अपर्णा खारकर

**सदस्य - Committee members**
अभिजित रायरीकर अनिता नवकाळ मानसी जोशी
वृषाली पानट संगीता चव्हाण क्षमा मराठे

**विश्वस्त - The Board of Trustees:**
शाम अंतुरकर सुजीत वैद्य जयदीप बुझरुक

**‘रचना’ संपादक - Editor:** विनता कुलकर्णी:

अंकासाठी मजकूर, बातम्या, साहित्य पाठविण्यासाठी संपादक – संपर्क:
**Email**: Rachana@mahamandalchicago.org

‘रचना’चे संक्रांत, गुढीपाडवा, गणपती व दिवाळी ह्या कार्यक्रमांपूर्वी तसेच क्वचित् विशेष प्रसंगानुरूप असे वर्षातून साधारण ४–५ अंक प्रसिध्द होतात. साधारण १५ दिवस अगोदर संपादकांच्या हाती आलेले निवडक साहित्य नजिकच्या अंकात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक वा कार्यकारिणी सहमत असतेच असे नाही. हाती आलेल्या प्रकाशन–योग्य मजकूरात किरकोळ बदल आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील. पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेलने दिली जाईल.

### जाहिरातींचे दर : ( Advertisement Rates)

For advertisement rates, distribution of any kind of personal or business flyers during MMC programs, and for advertisements on MMC website and in ‘Rachana’,
Contact : president@mahamandalchicago.org

### महाराष्ट्र मंडळ, शिकागो (MMC) बद्दल काही उल्लेखनीय नोंदी

- It is the first Maharashtra mandal in the United States of America, serving the local community as a non profit organization, since 1969
- It is the proud founder of (BMM) Brihan Maharashtra Mandal, North America: http://www.bmmonline.org/
- It is also the initiator of BMM newsletter –BMM Vrutta: http://www.bmmonline.org/vrutta
- Click Constitution of MMC (press CTRl+click) to review Objectives and Constitution of MMC

या अंकासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांना धन्यवाद !

# या अंकात ...

अध्यक्षीय ............................. ४

गणेशोत्सवानिमित्त कार्यक्रम

डिसेंबर २०११ पर्यंतचे महत्त्वाचे सण/दिवस .... ५

मंगल मूर्ती मोरया ............................. ६

श्री गणेश एक चिंतन ............................. ८

अक्षरं ब्रह्म परमं ............................. ९

‘On the nature of understanding’............... ११

कविता ‘तह’

Funny Cell Phone-App

महासेतू ‘दान् यांग कुन् शांग’ ..................... १२

‘रचना’ २०११ शब्दकोडे क्र.२चे उत्तर

‘रचना’ २०११ शब्दकोडे क्र.३:

Thanks to Maharashtra Mandal Chicago’s
Well Wishers / Business Entrepreneurs



## अध्यक्षीय

नमस्कार मंडळी

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे १५ वे अधिवेशन, जुलै २१ ते २४, २०११, या दरम्यान शिकागो येथे अगदी दिमाखात पार पडले. गेली दोन वर्षे महाराष्ट्र मंडळ शिकागोचे अनेक कार्यकर्ते, अधिवेशनाशी निगडीत अनेक समित्या आणि त्यात सामील झालेले शिकागो आणि आसपासच्या मंडळांतील समस्त मराठी भाषक आणि मराठीप्रेमी यांच्या श्रमाचे चीज झाले. अधिवेशन उद्घाटन सोहोळ्याच्या प्रसंगी महाराष्ट्र मंडळ शिकागोने सादर केलेल्या ‘प्रवास – एका मराठी स्वप्नाचा’ ह्या कार्यक्रमाचे सर्वांनी कौतुक केले. अधिवेशन यशस्वी झाले हे सांगण्याची आवश्यकता नाहीच पण ह्या अधिवेशनामुळे आपण सर्व एक समानतेने एकत्र आलो, आणि एवढे मोठे कार्य सामंजस्याने सहकार्याने पार पाडले हे सर्वात मोठे यश आहे असे म्हणावेसे वाटते. प्रत्येकाने नेमून दिलेले काम वेळच्या वेळी आणि तत्परतेने पार पाडलेच आणि त्यापलिकडे जाऊन पडेल ते काम केले. त्यामुळेच हे अधिवेशनरूपी शिवधनुष्य आपण सहजपणे पेलू शकलो.

बृहन्महाराष्ट्र मंडळ शिकागो कार्यकारिणी व अधिवेशनाची संयोजन समिती आपणां सर्वांनी अधिवेशनासाठी केलेल्या मदतीबद्दल व सहकार्याबद्दल आपली सदैव ऋणी आहे. ह्या यशस्वी अधिवेशनानंतर आपल्या शिकागो मराठी मंडळाचा पुढील कार्यक्रम –गणेशोत्सव– १० सप्टेंबर रोजी आहे. कार्यक्रमासंबंधी अधिक माहिती याच पानावर दिली आहे. कार्यक्रमास उपस्थित राहून आपल्या जोरदार प्रतिसादाची व पाठिंब्याची विनंती!

आपला नम्र

**मिलिंद पानट**

**अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ शिकागो**

## गणेशोत्सवानिमित्त

**शनिवार, दि. १० सप्टेंबर, २०११**

स्थळ: लेमॉन्ट हिंदू टेंपल, 10915 Lemont Rd, Lemont IL 60439

गणेश पूजा सकाळी ९:३० ते ११

लहान मुलांसाठी गणपती अथर्वशीर्ष पठण – सकाळी १०

आरती सकाळी ११:००,

गणेश दर्शन आणि प्रसाद ११:३० ते १२

भोजन – दु. १२ ते १:३०

मनोरंजनाचे विविध कार्यक्रम दु. १:३० ते ४

**(Young and inspired/Skits not presented at BMM and Presentation from Maharashta Foundation)**

**प्रवेश शुल्क:**

(Following rates are per person)

a. Patron/Annual pass holders – FREE
a. Members (Annual and Life) - $15
b. Non-Members - $20
c. Children – Below 5yrs - Free
   5-12yrs - $10(Member) / $15 (Non-members)
d. Fulltime Students with ID only - $10

Note: 1) MMC reserves rights to change the programs or order of progrms.
2) No discounts or free entries are allowed for Ganesh Darshan.

**(Tickets will be available at the venue. Please bring your check book)**

**RSVP आवश्यक: RSVP** साठी अंतिम तारिख– ४ सप्टेंबर,२०११, संध्याकाळी ५ (CT) पर्यंत:

for RSVP: Please visit
http://www.mahamandalchicago.org/
http://www.mahamandalchicago.org/eventdetails.aspx?id=104#RSVP

# डिसेंबर २०११ पर्यंतचे महत्त्वाचे सण/दिवस

सप्टेंबर १, गुरुवार – श्रीगणेश चतुर्थी

सप्टेंबर ११, रविवार – अनंत चतुर्दशी

सप्टेंबर २८, बुधवार – घटस्थापना

ऑक्टोबर २, रविवार – महात्मा गांधी जयंती

ऑक्टोबर ६, गुरुवार – दसरा

ऑक्टोबर २६, बुधवार – नरकचतुर्दशी

ऑक्टोबर २७, गुरुवार – बलिप्रतिपदा

ऑक्टोबर २८, शुक्रवार – भाऊबीज

September 5, 2011 (Monday): Labor Day

October 10, 2011 (Monday): Columbus Day (observed)

November 11, 2011 (Friday): Veterans' Day

November 24, 2011 (Thursday): Thanksgiving Day

December 25, 2011 (Sunday): Christmas Day

December 26, 2011 (Monday): Federal employees extra day off for Christmas

**महाराष्ट्र मंडळ शिकागोचे २०११चे आगामी अन्य कार्यक्रम- TBD**

**Indian Dance School**
**Dance together!! Build bond with your daughter!!!**
**For Kathak, Bollywood and Yoga**



**Contact: Gauri Jog Phone: 847-755-9625**
**Email: gaurijog@gmail.com**
**http://www.gaurijog.com**

# ॐ || गणपती बाप्पा मोरया || मंगल मूर्ती मोरया || ॐ

मूर्ती नसावी प्लास्टरची | मूर्ती असावी मातीची |
अथवा कागदाच्या लगद्याची | सहज पाण्यात विरघळते ||१||
वापरू नका थर्मोकोल | पर्यावरण आपुले अनमोल |
विचार करावा सखोल | श्री गणेश भक्तांनी ||२||
वर्गणीसाठी नको जबरदस्ती | स्वीकारा जी मिळेल हाती |
देणगीदारांना द्या पावती | व्यवहार ठेवा पारदर्शक ||३||
नको मिरवणूक बेताल | मिरवणुकीत हवा सूर ताल |
वाजवा वीणा मृदंग टाळ | जशी पंढरीची वारी ||४||





आवाज नको फटाक्यांचे | मोठमोठ्या ध्वनीक्षेपकांचे |
कर्णकर्कश्श बेंजोचे | वाढले ध्वनी प्रदूषण ||५||
आरास नको थर्मोकोलची | नको प्रखर झोतांची |
नसावी लाखो दिव्यांची | वीजेची बचत करावी ||६||
आरास असावी कागद, फुलांची | किंवा रेशमी वस्त्रांची |
नको तोडलेल्या फांद्यांची | वृक्षतोड थांबवा ||७||
नाही भव्य रोषणाईने | नाही अवाढव्य मूर्तीने |
गणेश पावतो भक्तीने | ख या गणेश भक्तांस ||८||

गणेश भक्तीचा भूकेला | गणेश भावाचा भूकेला |
नाही भपक्याचा भूकेला | दांभिकता नसावी ||९||
फुलांनी सजवावी मूर्ती | कर्णमधुर असावी आरती |
उत्सवाची वाढो किर्ती | असा असावा उत्सव ||१०||
व्हावे समाज प्रबोधन | असे ठेवावे व्याख्यान |
नको नुसतेच मनोरंजन | सार्वजनिक मंडळात ||११||
नको धमाका डिस्कोचा | असावा सुमधुर गाण्यांचा |
सुरेल भक्ती गीतांचा | मराठी हिन्दी वाद्यवृंद ||१२||





प्रबोधनात्मक कवितांचे | जनजागृतीपर रेखाचित्रांचे |
विचारशील छायाचित्रांचे | भरवावे प्रदर्शन ||१३||
ठेवावी लेझीम पथके | नको धुरांचे फटाके |
नको ट्रकमधून पथके | संकट वायुप्रदूषणाचे ||१४||
निर्माल्यं खतासाठी वापरावे | जलप्रदूषणास जाणावे |
मूर्तींचे विसर्जन करावे | कृत्रिम तलावामध्ये ||१५||
गणपती बाप्पा मोरया | मंगल मूर्ती मोरया |
मांगल्य आपण राखूया | श्री गणेश उत्सवांचे ||१६||

प्रेषक - सुरेश रघुनाथ पित्रे.
पत्ता- "वैद्य सदन", पहिला मजला, राघोबा शंकर रोड, लोअर चेंदणी, ठाणे (पश्चिम) , पिन कोड क्र. ४००६०१
संपर्क - ०२२ २५३३३८६९ ,२५३२६४२९. भ्रमणध्वनी ९००४२३०४०९ ,
Email ID - kharichavata@gmail.com

*With best compliments from*

# Ajit Gandhi, MBA

1-630-885-1200

ajitgandhi@hotmail.com



* **Retirement** Planning Strategies
* **Education** Funding Strategies
* **Insurance** Planning Strategies
* **Estate** Planning Strategies

*Serving the community for 30 years*

# श्री गणेश एक चिंतन ...

" सदैव होइजे प्रगती " किंवा
"चालणे चालणे चालणे पुढे पुढे "

श्री गणेश हे आपल्या एकात्मतेचे अमर प्रतीक आहे. आता काही मंडळी बुद्धिवादी, नास्तिक, तर्कनिष्ठ, पुरोगामी अशी असतात. असे असायला काहीच प्रत्यवाय नाही, सर्वांना वंदन करून येथे श्री गणेश, श्रीगणेशोत्सव यांचा सकारात्मक, विधायक आणि "रचनात्मक" असा विचार करूया.

ह्या उत्सवासंबंधी आणि देवतेसंबंधी सर्वश्री ज. स. करंदीकर अ. ज. करंदीकर, पु. रा. बेहेरे, पंडित महादेवशास्त्री जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जयंतराव साळगावकर, अमरेंद्र गाडगीळ, कवयित्री शांताबाई शेळके आणि कितीतरी जणांनी चिंतनपर लिहिले आहे. आजच्या शास्त्रीय, बुद्धिवादी, माहिती-तंत्रज्ञान तसेच आण्विक जगतातही हा उत्सव केवळ महाराष्ट्रात नव्हे तर भारतातील इतर अनेक राज्यांमधे आणि जगभरच्या मराठी मंडळांमधे उत्साहात संपन्न होत आहे. त्याच्यावर टीका होऊनही गेली ११८ वर्षे तो प्रगतीपथावरच आहे याचा अर्थ या उत्सवाच्या अंगी एक आंतरिक सामर्थ्य आहे हे निश्चित. तत्संबंधी काही गोष्टींचा उल्लेख :

महान अभ्यासक श्री अ. ज. करंदीकर म्हणतात, १८५७ च्या क्रांतीयुद्धात त्या युद्धाचे सूत्रधार व प्रणेते श्रीमंत नानासाहेब तथा धोंडोपंत पेशवे यांनी सांगूनही ग्वाल्हेरचे शिंदे सरकार नानासाहेबांना सामील झाले नाहीत. ही गोष्ट इंग्रजांना फारच लाभदायक ठरली. इंग्रजांचा जय झाला. अर्थात पुढे ही गोष्ट शिंदे सरकारांना फारच लागली. आपण क्रांतिकारकांना सहाय्य केले नाही ही गोष्ट त्यांच्या मनात डाचत राहिली. मन:शांतीसाठी त्यांनी आपल्या दरबारात श्री गणेश उत्सव चालू केला. श्री गणेशाचेच एक नाव धुंडिराज असे आहे आणि श्रीमंत नानासाहेबांचेही नाव धुंडिराज तथा धोंडोपंत असे होते. वरवर पाहता हा उत्सव गणपतीचा होता पण आतून ही कृती श्रीमंत नानासाहेबांच्या स्मृती प्रित्यर्थ आणि कृतज्ञता जागविण्याचा हा प्रयत्न होता. हा उत्सव पुण्याचे सरदार श्रीमंत खाजगीवाले यांनी पाहिला आणि पुण्यात असा उत्सव व्हावा असे त्यांना वाटू लागले. मग सर्वश्री खाजगीवाले, त्यांचे मित्र श्री घोटवडेकर आणि श्रीमान भाऊसाहेब रंगारी यांनी पुण्यातील गणेशोत्सवाचा घाट घातला. ही कल्पना लोकमान्य टिळकांनी मोठ्या प्रमाणावर उचलून धरली आणि प्रत्यक्ष लोकमान्यांचाच पुढाकार असल्यावर, मग काय, हा उत्सव सर्वदूर पसरला. खरेच लोकमान्यांच्या दूरदृष्टीला तोड नाही. जात, उपजात, पंथ, शिक्षित, अशिक्षित, शहरी, ग्रामीण, श्रीमंत, गरीब साऱ्यांना भेदांच्या पलिकडे जाऊन एकत्रित करतील अशी दोन दैवते त्यांनी अचूक हुडकून काढली. एक श्री गणराय आणि दुसरे छत्रपती श्री शिवराय! या दोहोंवर सगळ्यांचीच भक्ती, मतभेदाला कुठे वावच नाही. त्यामुळे या उत्सवात सारा महाराष्ट्र एकवटला आणि त्याचा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाला अतिशय उपयोग झाला.

श्री गणेशोत्सवामागे लोकमान्यांचे प्रमुख तीन उद्देश होते: लोकसंघटन, लोकशिक्षण आणि लोकजागृती. या उत्सवामागे लोकमान्यांची काय भूमिका होती यावर एक महान नेते श्री बिपिनचंद्र पाल यांनी चांगला प्रकाश टाकला आहे. या उत्सवातून लोकमान्यांना प्रजासत्ताकाचा म्हणजेच लोकशाहीचा प्रचार करावयाचा होता. कसे ते पाहा ना ....

Democracy हा ग्रीक भाषेतील शब्द. demos आणि cracy क्राच्य हा शब्द संस्कृत क्रतु यावरून आलेला दिसतो. क्रतु म्हणजे सामर्थ्य म्हणजेच लोकांचे सामर्थ्य लोकांची सत्ता. demos म्हणजे गण आणि इकडे गणपती म्हणजे गणांचा पती. अर्थात् जिथे गणाची सत्ता आहे ते गणराज्य. त्याचा ह्या उत्सवातून युक्तीप्रयुक्तीने प्रचार करता येईल ही लोकमान्यांची दृढ भावना होती. लोकमान्यांच्या चातुर्याला तोड नाही.

आता एका बुद्धिवादी, पुरोगामी, देवधर्म कर्मकांड न मानणाऱ्या, महाराष्ट्रभूषण पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्त्वाची कथा. पु.ल. हे थोडे समाजवादी विचारसरणीचे म्हणून प्रसिद्ध, तरीसुद्धा त्यांच्यावर श्री गणेश देवतेचा विशेष प्रभाव दिसतो. जिथे जिथे श्री गणपतीचा त्यांनी उल्लेख केलेला आहे तो अत्यंत आदरपूर्वकच केलेला. पूर्वरंग या पुस्तकात इंडोनेशियातील श्री गणेशाचे त्यांनी केलेले वर्णन वाचनीय आहे . गणगोत या पुस्तकात पु.ल. म्हणतात "आम्ही सारे मित्र गणेशोत्सवातील रात्री बाहेर पडावयाचो, बनाम हाल लेन गणपतीपुढे मल्लिकार्जुन मन्सूर यांचा स्वर लागलेला असे. तर चुनाम हाल लेनच्या गणपतीपुढे सवाई गंधर्व. तर कोणीतरी वार्ता आणत असे की ब्राह्मण सभेच्या गणपती उत्सवात बालगंधर्व गात आहेत. त्याच्याच पुढच्या गणपतीपुढे हिराबाई बडोदेकर तर गिरगाव नाके गणपतीपुढे मोगूबाई कुर्डीकर. एका रात्रीत काय काय आणि कुणा कुणाचे ऐकणार? मोठी विचित्र मन:स्थिती व्हायची आणि हे सर्व स्वर्गीय गायनाचे कार्यक्रम विनामूल्य ! खरोखर लोकमान्य, आपल्या गणेशोत्सवाने आम्हा रसिकांवर अनंत उपकार केलेले आहेत.” तर असे म्हणता येईल की गिरगाव आणि विले पार्ले येथील गणेशोत्सवांचा पुलंचा रसिक पिंड घडविण्यात फार मोठा वाटा आहे. अनुषंगाने अजून दोन सुंदर नि स्फूर्तिदायक किस्से सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

पुणे-नगर रस्त्यावर श्री क्षेत्र रांजणगाव पासून सुमारे १८ कि. मी. अंतरावर असलेल्या शिरूर घोडनदी ह्या तालुक्याच्या गावी मी नोकरी निमित्त असतांनाची गोष्ट. काही शिक्षकांनी अत्यंत प्रशंसनीय असा उपक्रम सुरू केला. एकाच्या घरी सर्व गावकरी एका संकष्टी चतुर्थीला संध्याकाळी जमा झाले. श्री गणेशप्रतिमेसमोर बसून सर्वांनी श्रद्धापूर्वक २१वेळां श्री गणपति अथर्वशीर्षाचे पठन केले. आरती, प्रसाद झाला. सर्वांना एकेक रुपया दक्षिणा देण्यांत आली. एकजण म्हणाले, ही दक्षिणा आपण एकत्रित करूया. सर्वांनी आपापली दक्षिणा श्री घनश्यामराव करंदीकर यांजकडे परत दिली. प्रत्येक चतुर्थीला हा उपक्रम चालू राहिला. त्यानंतर काही महिन्यांनी

परत केलेल्या दक्षिणेच्या जमा झालेल्या सर्व रकमेतून गरजू व आर्थिक दृष्ट्या गरिब अशा एका विद्यार्थ्यांस व विद्यार्थिनीस शालेय गणवेष दिले. त्या विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा आनंद अवर्णनीय होता. अथर्वशीर्षपठनाचा उपक्रम चालूच आहे. मदतीचा आकडा आणि गणवेषांची संख्या दोन वरून वाढत जाऊन ११९ वर आली आहे. किती सुंदर आणि उपयुक्त उपक्रम! भक्तांना भक्तीचा आनंद मिळाला आणि गरीब विद्यार्थ्यांची सोय झाली.

दुसरी स्फूर्तीदायी घटना आहे– प्रख्यात साहित्यिक, संशोधक रा. चिं. ढेरे यांच्याबद्दल. महाराष्ट्र शारदेचे महान भूषण असलेले डॉ. ढेरे यांचे बालपण अतिशय आर्थिक हलाखीत गेले. त्यांच्या बालपणी त्यांची आई आर्थिक परिस्थितीमुळे एकदा उकळलेल्या चहाची पूड तशीच ठेवून पुन्हा दोनदा त्याचाच चहा करी. वाण्याकडे सामान आणायला ते गेले तर 'ई पोरा, मागच्या वेळचा राहिलेला एक आणा आणून दे म्हणजे हे सामान देतो' अशी उत्तरे त्यांना ऐकायला मिळायची. असे गरिबीला तोंड देत ते शालान्त/ मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण झाले. पैशाची जमवाजमव करून महाविद्यालयात शिकू लागले. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला असताना अचानक वर्तमानपत्रात त्यांनी एक बातमी वाचली– 'जो कोणी मराठी विषयासंबंधी संशोधन करून दोन प्रबंध सादर करील त्याला पारितोषिक देण्यात येईल. चि. रामने श्री. नरसिंह सरस्वती चरित्र तथा श्री दत्त संप्रदायाचा इतिहास अन् श्री गुरु गोरक्षनाथ चरित्र तथा श्री नाथ संप्रदायाचा इतिहास असे दोन विषय निवडले आणि आश्चर्य म्हणजे एका वर्षात दोन्ही संशोधन–ग्रंथ पूर्ण करून सादर केले. यथावकाश परिक्षकांचा निर्णय घोषित झाला. चि. राम ढेरे यांच्या दोनही संशोधनग्रंथांना पारितोषिके मिळाली. या दोन ग्रंथांची कीर्ती सर्वदूर पोहोचली. विशेष हे की पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाने ती दोन पुस्तके एम. ए. च्या अभ्यासक्रमासाठी क्रमिक पुस्तके म्हणून लावली. बी. ए. प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याने लिहिलेले दोन ग्रंथ एम. ए.च्या अभ्यासक्रमात समाविष्ट केले गेले हे मोठेच आश्चर्य होते. त्यानंतर राम ढेरे शिष्यवृत्ती मिळवून बी ए. झाले.

काही हितचिंतकांकडून मिळालेल्या आर्थिक मदतीने ढेरे यांनी एम. ए. शिक्षणासाठी प्रवेश घेतला. त्यांचा एम. ए. वर्गाचा पहिला दिवस नि पहिला तास. ते शांतपणे येऊन शेवटच्या बाकावर बसले. प्राध्यापक वर्गात प्रवेश करते झाले पण जे ग्रंथ ते शिकविणार होते त्या ग्रंथांचे लेखकच म्हणजे रा. चिं. ढेरे समोर विद्यार्थी म्हणून बसलेले. सरांचा चेहराच पडला; पण तास घेणे तर भागच होते. कसाबसा तास त्यांनी आटोपला आणि त्यांनी समारोप केला, 'मित्रहो, मी आपणास शिकवले आहेच मात्र तुम्हाला काही शंका असल्यास तुमच्यात ढेरे बसलेले आहेत त्यांना विचारा.' असो.

काही कारणांनी ढेरे एम. ए. शिक्षणाचे वर्ष पूर्ण करू शकले नाहीत. मुद्रितशोधन आदी कामे ते करू लागले पण त्यांचा पिंड काही स्वस्थ बसणाऱ्यांपैकी नव्हता. त्यांना आपण पी. एच. डी. पदवी घ्यावी असे वाटू लागले. त्यांनी अर्ज केला नि काय आश्चर्य? विशेष बाब ह्या सदरखाली त्यांना पी. एच. डी करण्याची अनुमती मिळाली एम. ए. न करता!

संतश्री नामदेवमहाराज याचे गुरू संतश्री विसोबा खेचर यांचा Shatsthaladarshan हा ग्रंथ ढेरे यांनी संशोधनासाठी निवडला. परिश्रमपूर्वक त्यांनी आपला प्रबंध ग्रंथ पूर्ण केला. पुढे हा प्रबंध "चक्रपाणी" या नावाने प्रसिद्ध होऊन जाणकारांनी त्यांस अतिशय नावाजला. सूक्ष्म चिकित्सा करून संशोधन केलेला हा प्रबंध. पण ढेरे यांना त्यासाठी पी. एच. डी. पदवी मिळालीच नाही. म्हणजे एव्हढे प्रचंड परिश्रम वाया गेले? नाही. श्रीमद् भगवद्गीतेत म्हटले आहे ,'चांगली गोष्ट कधीच वाया जात नाही.' परिक्षक मंडळाने श्री आदरणीय रा. चिं. ढेरे यांना त्यांच्या संशोधन कार्यामुळे, साहित्य विद्यानिधी म्हणजे डी. लिट. ह्या पदवीने गौरविले.

मी ढेरेसाहेबांना म्हंटले– रामभाऊ, आपले परिश्रम, चिकाटी, बुद्धिमत्ता, संशोधनाची आवड ह्या गोष्टी तर आपल्या यशाला कारणीभूत आहेतच पण आणखी काही? त्यावर श्रीमान् रामभाऊ लगेच उत्तरले, "वयाच्या पाचव्या वर्षापासून मी श्री गणपति अथर्वशीर्ष म्हणत आलो आहे. तसेच २१ जुलै हा माझा वाढदिवस तेव्हा १ जुलै ते २१ जुलै मी प्रतिदिन २१ वेळां गणपतिअथर्वशीर्ष म्हणतो तेव्हा श्री गजाननाची मजवर कृपा आहेच.." अस्तु.

काही पारंपारिक प्रथा आधुनिक दृष्टीनी विचार केल्यासही उपयुक्त ठरतात. अग्नी वाईट नाही. त्याचा चांगला उपयोग केला पाहिजे. अणुशक्ती वाईट नाही. तिचा चांगला उपयोग करता आला पाहिजे. असो. समारोप करताना म्हणतो की श्री गणेश म्हणजे मांगल्याचे, ज्ञानाचे प्रतीकरूप, त्यांस वंदन, आणि सर्वांना श्री गणेशोत्सवाच्या निमित्ताने खूप खूप शुभेच्छा.

**– सुहास हरी जोशी ( पुणें )**

*shjoshi5110@gmail.com*

*(अमेरिकेतील वास्तव्यात संपर्क – फोनः 617–930–9016)*

*@ डॉ. मोरेश्वर भानुदास वझे, (Bedford, MA) :*

**"अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽ ध्यात्म मुच्यते ।**
**भूत भावोभ्दवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ "**

**भगवत् गीता (८.३)**

**English Transliteration:**

The imperishable is (ब्रह्मन्) Brahman.
The subjective self (अध्यात्म) adhyatma in individual is his/her nature.
The creative force is (कर्म) Karma , which is the cause of existence and manifestation of all beings.

# Welcome to Raj Palace Restaurant

www.rajpalace.net



Executive Chef Mr. Sunder Singh Chauhan, bought this location as of April 2010, with great pride and enthusiasm to serve a variety of Indian dishes with top notch service. As a chef, throughout his whole life Mr. Chauhan worked in many five star hotels and restaurants in India and the U.S.A. Using the finest vegetables, meat and sea foods which are fully flavored with fancy spices and modest herbs which combine to provide a culinary experience to all of our guests. Our menu consists of food originating from many parts of India.



Mr. Chauhan has opened his door to enchant you with his authentic food creation technique, along with his son Mr. Vijay Chauhan also a great chef (Like father, like son) & family.

We hope that you will enjoy the authenticity of the Indian food from Raj Palace. Experience the difference!!

RAJ PALACE RESTAURANT
855-57, E Schaumburg Road
Schaumburg, IL 60194
Tel: 847-524-3007
Fax: 847-524-0778
Email: vchauhan_82@yahoo.com




1. We have the most competitive prices and packages.
2. Each event receives our undivided our undivided attention.
3. Quality and taste of our product is unparallel.
4. We respect the trust & confidence you have in us.





## On The Nature Of Understanding

“Say you hoped to
Tame something
Wild and stayed
Calm and inched up
Day by day.
Or even
Not tame it but
Meet it halfway.
Things went along
You made progress
Understanding
It would be a
lengthy process
sensing changes
In your hair and
Nails. So it's
Strange when it
attacks: you thought
you had a deal.”
- Kay Ryan from the New Yorker

## (वरील कवितेचे माझे मराठीकरण) - तह

तुम्हाला वाटले होते
कदाचित
कि आपण आयुष्यावर
एक लगाम घालू शकू
लगेच नव्हे तरी
केव्हातरी
मध्ये मिळून
वाटले तुम्हाला
कि आपण करतोय
प्रवास
माहित आहे
कि बराच वेळ लागेल
दिसते न
आपल्याच केसांच्या
रंगामधे
मग
कशाला आश्चर्य वाटावे
जेव्हा
लगाम तुटला जातो
उगाचच
वाटले होते
कि
आयुष्याशी तह
झाला होता म्हणून

**- धनंजय जोशी (शिकागो)**

## Funny - Cell Phone –App

Just imagine you are in a party, and people are sitting quietly. Suddenly you feel like having some fun. You can drink beer (not literally), but on your phone. You get a sensational liquid with foam, bubbles and burping sound. Just keep your android phone in an upright position, and voila! Your cell phone transforms to a cold glass of frothy beer. Keep the phone at the edge of your lips (as if you are drinking real beer) and tip it back a little. The graphics are very realistic and you will be ensured that the party has a hilarious laugh. This app has had about 5,000,000 installs till date, is free, and has a 3.8 rating on the android market.




COMPLIMENTS FROM:

**BROOKVILLE MEDICAL CENTER**

- *Comprehensive Family Healthcare*
- *Women's Health*
- *Child Health & Vaccinations*
- *Preventive Healthcare*
- *Aggressive Health Surveillance*
- *And Much More*

*Varsha Sambare MD*
BOARD CERTIFIED IN FAMILY PRACTICE

*Datta Sambare MD*
BOARD CERTIFIED IN INTERNAL MEDICINE

485 S.WEBER RD. BOLINGBROOK, IL 60490
e-mail: brookvillemedical@sbcglobal.net
Tel. (630) 378-2000

## ‘रचना’ २०११ शब्दकोडे क्र.२चे उत्तर

**संकलन : अभिजित रायरीकर**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 अ | भि | 2 नं | द | 3 न | ■ | 4 भ्र | म | 5 नि | रा | 6 स |
| नु | ■ | त | ■ | व | ■ | म | ■ | जा | ■ | र |
| 7 मो | हो | र | ■ | 8 नि | पु | ण | ■ | 9 म | न | सा |
| द | ■ | ■ | ■ | र्मि | ■ | गा | ■ | ■ | ■ | व |
| 10 न | ग्ना | 11 व | स्थे | त | ■ | 12 था | टा | 13 मा | टा | त |
| ■ | ■ | ज | ■ | ■ | ■ | ■ | ■ | न | ■ | ■ |
| 14 पा | व | न | खिं | 15 ड | ■ | 16 ग | ज | व | द | 17 न |
| र्श्व | ■ | ■ | ■ | ळ | ■ | र्द | ■ | ■ | ■ | ख |
| 18 सं | डा | 19 स | ■ | 20 म | ळ | भ | ■ | 21 मा | व | शी |
| गी | ■ | र | ■ | ळी | ■ | री | ■ | र्द | ■ | खां |
| 22 त | प | शी | ला | त | ■ | 23 त | पो | व | ना | त |

## ‘रचना’ २०११ शब्दकोडे क्र.३

**संकलन: विनता कुलकर्णी**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | ■ | २ | | | ३ |
| | ■ | ४ | | ५ | | ६ | |
| ७ | | | ८ | ९ | १० | | |
| | ■ | | | ११ | | | |
| | १२ | | | | | १३ | |
| | | १४ | | | | | |
| | | | ■ | 15 | | | १६ |
| १७ | | | | | ■ | १८ | |

### उभे शब्द

१. सर्व ह्य अर्थी

३. ह्याचा वार शनिवार

४. निवडणूका आल्या की ह्यांचे महत्त्व

५. कावळा

६. झुला

७. मर्यादा – या अर्थी

८. आराखडा

१०. रामाचे नांव

११. याचा पर्वत म्हणजेअतिशयोक्ती

१२. पोवाडा रचणारे /मराठी गीतकार

१३. रत्नागिरी जिल्ह्यातील गांव/ पर्यटन स्थळ

१४. आदेश

१५. जमाना/युग ह्या अर्थी

१६ शपथ

### आडवे शब्द

१. गणपतीचे नांव

२. अलिकडेच अमेरिकेत झालेल्या तूफानाचे (hurricane) चे नांव

४. द्राक्षाचा प्रकार

५. त्वचा

६. ऐट ह्या अर्थी

७ लहानात लहान

९ हे नाही... त्याला भीती कशाला ...

११. पोपटाचे नांव

१२. विद्येची देवता

१३. बांसरीचाच प्रकार

१४. ह्या “ पुढती जिथे, गगन ठेंगणे”

१५. अर्ध शतक

१७. स्त्री पात्राची भूमिका करणारे नामवंत कलाकार

१८. जुन्याकाळातील वजनाचे माप/ प्रमाण

## महासेतू दान्यांग कुन्शांग



चीन मधील शेदाँग प्रांतातील किंगदाओ या शहरात बांधलेल्या ‘दान् यांग कुन् शांग’ ह्या पुलाची लांबी 164,800 मीटर (164.8 किलोमीटर) आणि रुंदी 260 फूट आहे. बीजिंग ते शांघाय ‘हाय स्पीड” रेल्वेमहामार्गावरील आराखड्यानुसार हा पूल बांधला. २०१०वर्षाच्या अखेरीस ह्या पुलाचे बांधकाम पूर्ण होऊन जून २०११मधे तो वाहतूकीसाठी खुला झाला. २०११च्या गिनीज विश्व नोंदणीनुसार ‘दान् यांग कुन् शांग’ हा जगातील सर्वात लांब पूल आहे.

शब्दकोड्याचे उत्तर व अचूक उत्तर पाठविणाऱ्यांची नांवे पुढील अंकात प्रकाशित करू. शब्दकोड्याचे संपूर्ण उत्तर (scanned copy) Rachana@mahamandalchicago.org ह्या ईमेलवर पाठवावे.